# राज्य कुटुंब कल्याण कार्यालय, महाराष्ट्र राज्य

**राज्य कुटुंब कल्याण कार्यालय, पुणे**
**महाराष्ट्र राज्य**

| | | |
|---|---|---|
| अतिरिक्त संचालक<br>दूरध्वनी क्रमांक (वै) -<br>कार्यालय दूरध्वनी क्र. | २६०५८९६<br><br>२६०५८७९<br>२६०५८१९<br>२६०५८४६ | अतिरिक्त संचालक, आरोग्य सेवा, कुटूंबकल्याण, माताबाल संगोपन व शालेय आरोग्य, कुटूंब कल्याण भवन, राजाबहादूर मिलरोड, रेल्वेस्टेशनच्या मागे,पुणे १<br>फॅक्स नं.- ०२० - २६०५८७६६ / २६०५८१५९<br>ई-मेल नं.adhscell@vsnl.net |
| **आरोग्य सेवा** | | जा.क्र.राकुकका/आय.एम.एस./ ॲक्ट/ अंमलबजावणी / D-15/ /१०<br>दिनांक :- ३०/०८/२०१०. 59664-847 |

प्रति,
**मा. मुख्य कार्यकारी अधिकारी,**
**जिल्हा परिषद———————**

विषय :- Infant Milk Substitutes feeding bottles and Infant foods ( Regulation of Production supply & Distribution) Act, 1992 & Ammendment Act., 2003 च्या प्रभावी अंमलबजावणी बाबत...

**संदर्भ** :- **१)** F. No. 5 (20)/2010-ND/Tech. Govt. of India, Misnstry of WCD / New Delhi dt.23/6/2010 (सोबत जोडले आहे)
२) दिलीप बंडवे, अव्वर सचिव महाराष्ट्र शासन यांचे पत्र क्र. २०१०/प्र.क्र/१२१(१०) आरोग्य-७ ब, सार्व, आरोग्य विभाग मंत्रालय मुंबई दि.६/०८/२०१०.
३) जा.क्र. रा.आ.सो/ DCP/१०५१९/१० दि.१०/८/२०१०

वरील संदर्भीय विषयान्वये स्तनपान व शिशू पोषण हा कार्यक्रम महाराष्ट्र राज्यामध्ये आरोग्य विभाग आय.सी.डी.एस, राजमाता जिजाऊ माता बाल आरोग्य व पोषण मिशन एन.आर.एच.एम, युनिसेफ व बी.पी.एन.आय यांच्या समन्वयातून प्रभावीपणे राबविण्यात येत आहे. स्तनपान व शिशुपोषणाबाबतचे ज्ञान व कौशल्य देऊन मातांनाही सक्षम करण्यात येत आहे. त्यामुळे कुपोषणाचे प्रमाण कमी होऊन भविष्यात बाल मृत्यु दर ही कमी होण्यास मदत होणार आहे.

तथापि आईच्या दुधाला पर्याय म्हणून उपलब्ध दूध, दुधाची भुकटी, पूरक आहारासाठी डबाबंद पदार्थ व बाटल्या तयार करणाऱ्या काही कंपन्याच्या या वस्तूंच्या भडक जाहिरातीमुळे आईच्या दुधा ऐवजी बालान्नाचा वापर होताना दिसत आहे. त्यामुळे बालकांचे आजार, कुपोषण व बालमृत्यू यांचे प्रमाण वाढलेले दिसत आहे. ही सर्वसामान्य जनतेच्या आरोग्याशी निगडीत असणारी महत्त्वाची समस्या आहे हे ओळखून भारत सरकारने सन १९९२ मध्ये जागतिक आरोग्य संघटनेच्या मार्गदर्शनाप्रमाणे आय.एम.एस. ॲक्ट (कायदा) लागू केला. याव्दारे वरील वस्तुंचे उत्पादन, पुरवठा व वितरण हयांचे नियमन करण्यात आले. यात २००३ मधे सुधारणा केली गेली. या कायद्यातील महत्वाच्या तरतुदी खालील प्रमाणे -

१. या वस्तूंची खरेदी व वापर याला प्रत्यक्ष वा अप्रत्यक्षरित्या प्रोत्साहन देण्यावर बंदी.
२. कुठल्याही प्रसारमाध्यमाव्दारे सर्व प्रकारच्या जाहिरातींवर मनाई.
३. मातेला व आरोग्यसेवकाला भेटवस्तू किंवा वरील वस्तूंचे मोफत नमुने देण्यात बंदी.

४. या वस्तू तसेच शैक्षणिक साहित्य किंवा इतर जिन्नस देणगीच्या स्वरुपात देण्यास मनाई.
५. या वस्तूंवर बालकाचे, मातेचे अथवा कार्टुनचे चित्र छापण्यास बंदी.
६. आरोग्य संस्थांना किंवा सेवकांना कुठल्याही उपक्रमासाठी किंवा वैयक्तिक पातळीवर देणगी, भेटवस्तू वा धनराशी देण्यास बंदी.
७. मालाच्या विक्रिच्या प्रमाणावर कर्मचाऱ्यांना दलाली देण्यास मनाई.

या कायदयामुळे बऱ्याच कंपन्या आपल्या मालाचे विक्रिसाठी व प्रसिध्दीसाठी हॉटेल मध्ये खाजगी वैद्यकिय व्यवसायीकांच्या बैठका घेतात यावर लक्ष ठेऊन बंदी घालणे आवश्यक आहे. म्हणून या कायदयाची कडक व प्रभावी अंमलबजावणी करता खालील प्रमाणे समिती गठन करणेत यावी.

**स्तनपान शिशुपोषण समिती**

| | |
|---|---|
| १) मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद | :– अध्यक्ष |
| २) जिल्हा आरोग्य अधिकारी | :– सदस्य सचिव |
| ३) जिल्हा शल्य चिकित्सक | :– सदस्य |
| ४) जिल्हा प्रजनन व बाल आरोग्य अधिकारी | :– सदस्य |
| ५) उप-मुख्य कार्यकारी अधिकारी महिला बाल कल्याण | :– सदस्य |
| ६) जिल्हा पोलिस प्रमुख | :– सदस्य |
| ७) सहाय्यक संचालक, अन्न व औषधी द्रव्ये विभाग | :– सदस्य |
| ८) I. M. A/ F.O.G.S.I/IPA चे प्रतिनिधी | :– सदस्य |
| ९) माता व बाल संगोपन कार्यक्रमाशी निगडीत स्वयंसेवी संस्था | :– सदस्य |

**समितीची कार्ये :–**

१) स्तनपान व शिशुपोषणाचे धोरण ठरविणे.
२) स्तनपान व शिशुपोषोण कार्यक्रमावर देखरेख व सनियंत्रण करणे.
३) I.M.S. Act ची कडक अंमलबजावणी करीता आवश्यक ते सर्व उपाययोजना राबविणे
४) कायदयाची प्रसिध्दी व विशेषतः खाजगी वैद्यकिय व्यवसायिकांमध्ये जाणीव जागृती करणे.
५) दर तीन महिन्यातून ऐकवेळा समितीची मिटींग घेऊन आढावा घेणे व पुढील नियोजन करणे.
६) वेळोवेळी केलेल्या कार्यवाहीची माहिती राज्य कुटुंब कल्याण भवन येथे पाठविणे.

संदर्भीय पत्र क्र.१ मधील परिछेद २ नुसार आय.एम.एस ॲक्ट मधील सेक्शन १२ मध्ये Powers of entry and search व सेक्शन २१ मध्ये i.e Cognizance of Offences which direct the State Government authorize an officer not below the rank of Class I, च्या मार्गदर्शक सूचना देण्यात आलेल्या आहेत, त्याचे अवलोकन व्हावे.

सोबत माहितीस्तव आय.एम.एस. ॲक्टची प्रत जोडली आहे.

अतिरिक्त संचालक, आरोग्य सेवा,
कुटूंब कल्याण, माता बाल संगोपन व शालेय आरोग्य, पुणे.

प्रत सादर,
१) सचिव आयुक्त (कुटुंब कल्याण) सार्वजनिक आरोग्य विभाग मंत्रालय, मुंबई.
२) सचिव महिला बाल कल्याण विभाग, मंत्रालय, मुंबई.
३) आयुक्त एकात्मिक बाल विकास सेवा योजना, रायगड भवन, नवी मुंबई.
४) आयुक्त अन्न व औषधी प्रशासन, मुंबई, विनंती की, या कायदयाच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी आपल्या स्तरावरुन राज्यातील सर्व सहआयुक्त व सहाय्यक आयुक्तांना आदेश निर्गमीत करण्यात यावेत.
५) अभियान संचालक, राष्ट्रीय ग्रामिण आरोग्य मिशन, मंत्रालय, मुंबई.
६) जिल्हाधिकारी.................(सर्व)
७) मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद .................(सर्व)

८) संचालक, आरोग्य सेवा, मुंबई.
९) प्राचार्य आरोग्य व कुटुंब कल्याण प्रशिक्षण, केंद्र, औरंगाबाद, अमरावती, पुणे, नागपूर,कोल्हापूर, नाशिक.
१०) अध्यक्ष आय.ए.पी महाराष्ट्र राज्य संघटना, मुंबई.
११) डॉ. दोदवाड, राज्य प्रशिक्षण समन्वयक, कुटुंब कल्याण भवन, पुणे.
१२)डॉ. प्रशांत गांगल,२३ रोलॅक्स अपार्टमेंन्ट न्यू ऐरा सिग्नल, एस.व्ही.रोड, मालाड (प) मुंबई.
१३) श्रीमती राजलक्ष्मी नायर, युनिसेफ, मुंबई.
१४) श्री. चंद्रसेन तूरकर, राज्य समन्वयक (पी.पी.एन.यु) महिला व बाल विकास विभाग, मंत्रालय मुंबई.
१५)डॉ. गोपाळ पंडगे, युनिसेफ सल्लागार (पी.पी.एम.यू), लातूर
१६) श्री.पी.डी.सुदामे, युनिसेफ सल्लागार (पी.पी.एम.यू), औरंगाबाद
१७) जिल्हा आरोग्य अधिकारी, जिल्हा परिषद ................(सर्व)

मासिक बैठकीमध्ये सर्व ता.वै.अ. व वै.अ. यांना माहिती दयावी.

१८)जिल्हा शल्य चिकित्सक, सामान्य रुग्णालय .............(सर्व)

मासिक बैठकीमध्ये सर्व वैद्यकीय अधिक्षकांना याची माहिती दयावी.